MHCH130006392025

# न्यायनिर्णय

(घोषीत दिनांक १ जून, २०२६ रोजी)

प्रस्तुत प्रकरणात पोलीस स्टेशन, राजुरा यांनी आरोपीविरुद्ध मोटार वाहन कायदा, १९८८ चे कलम १८५ अन्वये दिनांक ०५/०४/२०२५ रोजी दोषारोप पत्र दाखल आहे. प्रस्तुत प्रकरणात प्रतिवृत्त क्र.३९/२०२५ पोलीस ठाणे, राजुरा येथे श्री रमेश यादव यांनी नोंदवून घेतला असुन तपास राजुरा पोलीस स्टेशन अधिकारी यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे बयाण नोंदविले व आरोपीविरुद्ध दोषारोपपत्र दाखल केले.

**०२.** आरोपीविरुद्ध मोटार वाहन कायदा, १९८८ कलम १८५ अन्वये गुन्ह्याचा तपशील नि.क्र.१० वर नोंदविण्यात आला. आरोपीने प्रतिकथन नाकारल्यामुळे त्याचेविरुद्ध खटला चालविण्यात आला. आरोपीचे भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम ३५१(१)(ब) अन्वये जबाब नि.क्र.१ वरील आदेशाप्रमाणे वगळण्यात आले.

**०३.** उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला. निर्णीतीसाठी उद्भवलेले मुद्दे त्यावरील निष्कर्ष व निष्कर्षाची कारणमिमांसा पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष असे सिद्ध करतो काय की, घटनेच्या दिवशी आरोपी मोटार वाहन क्र. एम.एच-३४-सी.बी-४९९२ मद्यपान करून चालवित असताना मिळुन आला? | **नाही.** |
| २. | आदेश काय ? | **आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात येते.** |

## <u>का र ण मि मां सा</u>

**०४.** आरोपीविरुद्ध गुन्हा सिद्ध करण्याकरीता अभियोग पक्षातर्फे एक साक्षीदार तपासण्यात आले. पंच साक्षीदार क्र. १ बाबा कारूजी रायपुरे याची साक्ष नोंदविण्यात आली. अभियोग पक्षाला वारंवार संधी देऊन सुध्दा ईतर साक्षीदाराला हजर ठेवुन त्यांचा पुरावा नोंविण्यात असमर्थ ठरल्यामुळे नि.क्र.१ वर आदेश पारीत करून अभियोग पक्षातर्फे पुरावा बंद करण्यात आला.

**<u>मुद्दा क्र. १ करीता</u>** :-

**०५.** पंच साक्षीदार क्र.१ याने न्यायालयात हजर आरोपी याला ओळखत नसल्याचे सांगितले तसेच दिनांक १०/०२/२०२५ पोलीसांनी त्याना कुठेही बोलाविले नव्हते व त्याच्या समक्ष कुठलीही कार्यवाही केली नव्हती असे कथन केले आहे. साक्षीदाराला मौका पंचनामा दाखविल्यास त्यावरील सही ओळखत नसल्याचे कथन केले. सदर साक्षीदार हा अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्यामुळे सरकारी अधिवक्त्यांनी त्याला उत्तरसुचक प्रश्न विचारले, परंतु त्यात काहीही निष्पन्न झाले नाही.

**०६.** वरील पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, पंच साक्षीदार क्र.१ याने अभियोग पक्षास सहकार्य केले नाही. त्याच्या साक्षेस इतर साक्षदारांनी पाठपुरावा केलेला नाही. त्यामुळे खरोखरच मौका पंचनामा साक्षीदाराच्या समक्ष तयार केला होता, याबाबत संशय निर्माण होतो. अभियोग पक्षाने फिर्यादीची साक्ष न नोंदविल्यामुळे प्रतिवृत्त व मौका पंचनामा सिद्ध होऊ शकला नाही. अभियोग पक्षाला पुरेशी संधी देऊनसुद्धा अभियोग पक्ष इतर साक्षीदारांना हजर ठेऊन त्यांची साक्ष नोंदविण्यास असमर्थ ठरला आहे. त्या अनुषंगाने आरोपी हा दारूच्या नशेत मोटार वाहन चालवतांना मिळुन आला ही बाब सिध्द करू शकला नाही. वर चर्चिलेली बाब लक्षात घेता आरोपी हा घटनेच्या दिवशी आरोपी मोटार वाहन क्र. एम.एच.-३४-सी.बी.-४९९२ मद्यपान करून चालवताना मिळुन आला, ही बाब सिद्ध होत नाही. सबब मी मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारार्थी असे देत आहे.

**<u>मुद्दा क्र. २ करीता</u> :-**

**०७.** मुद्दा क्र.१ च्या नकारार्थी निष्कर्षास अनुसरून आरोपी निर्दोष सुटण्यास पात्र आहे. सबब मुद्दा क्र. २ च्या उत्तरार्थ खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येते.

## आदेश

**१.** आरोपी **जगदीश दिनकर लांडे** यांची भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम २७८(१) नुसार मोटार वाहन कायद्याचे कलम १८५ खालील आरोपातुन निर्दोष मुक्तता करण्यात येते.

**२.** आरोपीचे जातमुचलके व बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

**३.** आरोपीने रक्कम रु. १५०००/- चे वैयक्तीक बंधपत्र देऊन भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम ४८१ अन्वये पुर्तता करावी.

**(न्यायनिर्णय हा खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)**

स्वा/-
(आशू दिनेश पटेल)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
(कोर्ट क्र. ३), राजुरा.

दिनांक :- ०१/०६/२०२६.
स्थळ :- राजुरा.

## **प्र मा ण प त्र**

मी प्रमाणित करते की या पि.डी.एफ. करून अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द-नि-शब्द हे मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | : | जे. आर. हांडे, लघुलेखक श्रेणी-३. |
| न्यायालयाचे नांव | : | २रे सहदिवाणी व फौजदारी न्यायालय, राजुरा. |
| न्यायनिर्णयाची तारीख | : | ०१/०६/२०२६ |
| न्यायनिर्णयावर पिठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | : | ०१/०६/२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | : | ०१/०६/२०२६ |